**L. A. BILL No. CV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAMLATDAR'S COURT ACT, 1906.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५.**

**मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९०६ चा मुंबई २. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, मामलतदार न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ यामध्ये नवीन कलम १४अ समाविष्ट करणे.

**२.** मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९०६ चा मुंबई २.

नोटीस बजाविण्याची रीत.

"**१४अ.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाखालील प्रत्येक नोटीस, ती ज्या व्यक्तीवर बजावयाची असेल त्या व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत अभिकर्त्यास, एकतर, तिची प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल, अथवा जर उपरोक्त रीतीने ती बजाविता येऊ शकत नसेल तर, त्याच्या माहित असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा नोटीस ज्या जमिनीशी संबंधित असेल ती जमीन ज्या गावामध्ये स्थित असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीवर लागवड करण्यात येत असेल त्या गावातील एखाद्या सार्वजनिक राबत्याच्या जागी तिची प्रत लावून, किंवा इलेक्ट्रॉनिक मेल सेवेने ती बजाविता येईल.

(२) अशी कोणतीही नोटीस, त्यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावामध्ये किंवा पदनामामध्ये, किंवा कोणत्याही जमिनीच्या वर्णनामध्ये, कोणतीही चूक झाल्यामुळे, अशा चुकीमुळे मोठ्या प्रमाणात अन्याय झाला नसेल तर, निरर्थक झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.".

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(५) **पोलीस सुरक्षा.—** शेत रस्त्यांच्या किंवा वहिवाटीच्या मार्गांच्या वापराच्या प्रकरणांमध्ये, जर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याने, मामलतदाराच्या निर्णयाचे पालन करण्यात कसूर केली तर, अर्जदारास मोफत पोलीस सुरक्षा पुरविणे अनिवार्य असेल.".

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये,— सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २३ ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (२अ) मधील, “डेप्युटी कलेक्टर” या मजकुरानंतर, “, उपविभागीय अधिकारी” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (३) मधील, “डेप्युटी कलेक्टर” या मजकुरानंतर, “, उपविभागीय अधिकारी” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५.]**

**[मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.